03:23:11 PM

नि.फौ.ख. क्र.५६८/२०१६
सरकार वि. शेख सिंकदर
निशाणी २०

**फौ.प्र.सं.चे कलम २९९ प्रमाणे जबाब.**

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १**

**साक्षीदाराचे नाव** :- बंडु भावलाल बारवाल
वडीलांचे **पुर्ण नाव** :- भावलाल रामलाल बारवाल
**वय** :- ६७ वर्षे,
**व्यवसाय** :- शेती
**राहणार** :- आलापुर, ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षांमार्फत सरकारी वकील श्री. एन.एस.बडगुजर यांच्यामार्फत**

**१.** दि.३१.०३.२०१६ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कुठेही बोलाविले नव्हते. असे काही घडले नाही की, दि.३१.०३.२०१६ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष आलापुर शिवारात सविस्तर घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर केवळ माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला काहीही माहीती नाही. सहीला **निशाण क्र.PW-1-21** देण्यात येते.

**साक्षीदार त्याच्या पुर्व कथनांशी विसंगत अशी साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांना उलटतपासात विचारण्यात येतील अशा स्वरुपाची प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१.०३.२०१६ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष आलापुर शिवारात पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर फिर्यादी व आरोपी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घटनास्थळ दाखविले आणि हकीकत सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, राज्यमहामार्ग क्र.२११ धुळे-सोलापुर रोडवर आलापुर फाटा पोलीस चौकीच्या येथे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी सविस्तर घटनास्थळाचा

पंचनामा केला.  हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मला सदर पंचनामा वाचून दाखविला व बरोबर असल्याची खात्री झाल्यावर मी त्यावर सही केली.  हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी दुसरे पंच ज्ञानेश्वर केशवराव ठोकळ हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

समक्ष,  श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.04 17:33:34 +0530

**(वि. द. पाटील)**

दि.०४/०३/२०२६

03:32:04 PM

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**कन्नड**

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Court No.1, Kannad |
| Date | 04.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 04.03.2026 |
| Order uploaded on | 04.03.2026 |